**चक्रीवादळ दितवाह पश्चात ऑपरेशन सागर बंधू द्वारे श्रीलंकेसाठी अविरत आपत्कालीन मानवतावादी सहाय्य**

09 डिसेंबर 2025

विनाशकारी दितवाह चक्रीवादळानंतरच्या परिणामांमध्ये पहिला प्रतिसादक म्हणून श्रीलंकेला तातडीची मानवतावादी साहाय्य आणि आपत्ती निवारण (HADR) पुरविण्यासाठी भारताने 28 नोव्हेंबर 2025 रोजी ऑपरेशन सागर बंधू सुरू केले.

2. भारताच्या नेबरहुड फर्स्ट पॉलिसी आणि व्हिजन महासागर अंतर्गत, भारत या कठीण काळात श्रीलंकेच्या जनतेसोबत खंबीरपणे उभा आहे. श्रीलंकेच्या अधिकाऱ्यांशी जवळून समन्वय साधून, भारत गंभीरपणे प्रभावित व दुर्गम समजल्या गेलेल्या भागांसह संपूर्ण श्रीलंकेमध्ये बचावात्मक साहाय्य, जीवनावश्यक मदत व मानवतावादी साहाय्य, आणि महत्त्वाच्या जलद पुनर्प्राप्तीसाठी मदत पुरवित आहे. हवाई व समुद्री मार्गाने आपत्कालीन मदत सामग्री तातडीने पाठवून, भीष्म क्यूब्स आणि बेली ब्रिज सिस्टीमसह अनेक विशेष शोध व बचाव पथके, वैद्यकीय व अभियांत्रिकी उपकरणे व पथके वेगाने तैनात करून; आणि भारतीय सैन्य फिल्ड हॉस्पिटल उभारून हे साहाय्य केले गेले आहे.

3. ऑपरेशन सागर बंधू सुरू असताना, आजपर्यंत केलेल्या मानवतावादी सहाय्य कार्याची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:

मदत पोहोचविणे

• दितवाह चक्रीवादळाच्या पहिल्या तीन दिवसांमध्ये, 53 टन आपत्कालीन मदत सामग्री पोहोचविण्यात आली; आणि अनेक विशेष शोध व बचाव पथके आणि वैद्यकीय पथके तैनात करण्यात आली.

• 28 नोव्हेंबर 2025 रोजी, भारतीय नौदलाच्या (INS) विक्रांत आणि INS उदयगिरी या जहाजांद्वारे 9.5 टन आपत्कालीन ड्राय रेशन, कोलंबो येथील श्रीलंकेच्या अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आले.

• 29 नोव्हेंबर आणि 30 नोव्हेंबर 2025 रोजी, भारतीय हवाई दल (IAF) च्या तीन विमानांमधून – दोन C130J व एक IL76 – आणखी 31.5 टन मदत साहित्य पाठविण्यात आले, ज्यामध्ये टेंट्स, टार्पॉलिन्स, ब्लँकेट्स, स्वच्छता किट इ.; तसेच उच्च-प्राधान्य वैद्यकीय HADR साहित्य, दोन BHISHM मॉड्युलर ट्रॉमा क्युब्स, 4 टनांहून अधिक आवश्यक औषधे व वैद्यकीय वस्तू, ट्रॉमा विशेषज्ञ व आपत्कालीन

डॉक्टरांचा समावेश असलेली एक आरोग्य मैत्री टीम, आणि भारताच्या सर्वोत्तम नॅशनल डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स (एनडीआरएफ) च्या दोन विशेष अर्बन सर्च अँड रेस्क्यू (USAR) टीमचा समावेश होता.

• 01 डिसेंबर 2025 रोजी, INS सुकन्या वरून अतिरिक्त 12 टन जीवनावश्यक मदत साहित्य त्रिंकोमाली येथे पोहोचले.

• 02 डिसेंबर 2025, IAF C-17 ग्लोबमास्टर द्वारे तातडीच्या वैद्यकीय गरजा पूर्ण करण्यासाठी अॅम्ब्युलन्स, ट्रॉमा केअर युनिट्स, ऑपरेशन थिएटर्स, व 73 कर्मचारी असलेले एक मॉड्युलर भारतीय सैन्य फिल्ड इस्पितळ पोहोचविण्यात आले. तसेच, 500 मोबाईल वॉटर प्युरिफिकेशन युनिट्स देखील पाठविण्यात आले.

• 06 डिसेंबर 2025, भारत सरकारने भारतीय नौदलाच्या माध्यमातून तमिळनाडू राज्य सरकारकडून श्रीलंकेला देण्यात आलेले एकूण 997 टन कोरडे रेशन व इतर मदत साहित्य पोहोचविण्यात आले. भारतीय नौदलाच्या INS L51, INS L54, व INS L57 या तीन लँडिंग क्राफ्ट युटिलिटी जहाजांद्वारे तुतीकोरिनहून 352 टन मदत साहित्य पाठविण्यात आले जे 07 डिसेंबर 2025 रोजी कोलंबो येथे पोहोचले. INS घरियाल द्वारे चेन्नई येथून 645 टन मदत साहित्य पाठविण्यात आले जे, 08 डिसेंबर 2025 रोजी त्रिंकोमाली येथे पोहोचले.

जीव वाचविणे

• दितवाह चक्रीवादळाच्या पहिल्या 24 तासांत, जेव्हा शोध व बचाव कार्यांची सर्वाधिक आवश्यकता होती तेव्हा तिथे विशेष पथके पाठवून श्रीलंकेला प्रशिक्षित आपत्ती प्रतिसादकर्ते पाठविणारा भारत हा पहिला देश होता. आजपर्यंत, 450 पेक्षा अधिक लोकांना वाचविण्यात आले व मदत करण्यात आली आहे.

• 29 नोव्हेंबर 2025 रोजी पहाटे,IAF IL-76 विमानाने भारताच्या सर्वोत्तम अशा नॅशनल डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स (NDRF) दोन विशेष टीम कोलंबो येथे पोहोचल्या. 80 कर्मचारी व एक K9 शोध व बचाव युनिटचा समावेश असलेल्या या NDRF टीम्सनी श्रीलंकेच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधून काम केले, आणि त्यांना बदुल्ला,कोच्चीकडे, पट्टलम, कोलंबो, व गम्पाहा या चक्रीवादळाच्या सर्वाधिक बाधित भागांमध्ये तैनात करण्यात आले. NDRF'च्या ऑपरेशन्समध्ये पाण्याखाली गेलेल्या परिसरातून जाणे, अडकलेल्या घरांपर्यंत पोहोचणे, नुकसानग्रस्त इमारतींमध्ये अडकलेल्या लोकांना साहाय्य करणे, मृतदेह बाहेर काढणे, मदत वितरित करणे, व गरजेनुसार तातडीने पॅरामेडिक सेवा पुरविणे यांचा

समावेश होता. धोकादायक पाण्याची परिस्थिती, खराब मार्ग, व अस्थिर भूभाग अशी परिस्थिती असतानाही टीमने मदतीच्या प्रत्येक हाकेला प्रतिसाद दिला.

• ऑपरेशन सागर बंधूच्या पहिल्या दोन दिवसांमध्ये INS विक्रांत वरील दोन चेतक हेलिकॉप्टर्स पाठविण्यात आली. यानंतर आठवडाभर दररोजच्या ऑपरेशन्ससाठी सातत्याने दोन IAF Mi-17 V5 हेलिकॉप्टर्सचा वापर करण्यात आला. या दोन्ही हेलिकॉप्टर्सनी तातडीच्या बचाव कार्यांसाठी, गरोदर महिलांना, बाळांना, दिव्यांग व्यक्तींना, व इतर असुरक्षित समुदाय सदस्यांना मदत करण्यासाठी; गंभीररीत्या जखमी व्यक्तींना नेण्यासाठी; भूस्खलन झालेल्या भागांमध्ये श्रीलंकेच्या लष्कराच्या जवानांना नेण्यासाठी; आणि दूरस्थ व दुर्गम भागांमध्ये मदत साहित्य पोहोचविण्यासाठी श्रीलंकेच्या हवाई दलाच्या जवानांसह काम केले. IAF ची Mi-17 HADR ऑपरेशन्स श्रीलंकेत अद्यापही सुरू आहेत.

• आरोग्य मैत्री टीमने तातडीने आवश्यक ते साहाय्य पुरविण्यासाठी BHISHM क्युब्स तैनात करून अनेक दिवसांसाठी एक वैद्यकीय युनिट चालविले, तसेच, काटुनायके येथे श्रीलंकेच्या हवाई दलाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना ऑन-साईट प्रशिक्षण दिले, ज्यामुळे इतर बाधित भागांमध्ये BHISHM क्युब्सची तैनाती करणे शक्य झाले.

• बदुल्ला जिल्ह्यातील महियांगणाया येथे स्थापन करण्यात आलेल्या भारतीय लष्कराच्या फिल्ड हॉस्पिटलने 08 डिसेंबर 2025 पर्यंत 3388 लोकांवर उपचार केले आहेत, ज्यामध्ये शस्त्रक्रिया करण्याचाही समावेश आहे. हे फिल्ड हॉस्पिटल अजूनही तैनात आहे.

कनेक्टिव्हिटी रिस्टोर करणे

• 03 डिसेंबर ते 09 डिसेंबर 2025 दरम्यान, भारतीय लष्कर अभियंत्यांच्या विशेष टीम्स सह चार मॉड्युलर बेली ब्रिज सिस्टीम्स, श्रीलंकेत तैनात करण्यासाठी चार IAF C-17 ग्लोबमास्टर विमानांद्वारे हवाई मार्गे पाठविण्यात आल्या आहेत.

• या त्वरित इंस्टॉल करता येणाऱ्या ब्रिज स्ट्रक्चर मुळे महत्त्वाची कनेक्टिव्हिटी लिंक्स पुनर्स्थापित करणे शक्य होईल, ज्यामुळे भूस्खलन व पूर बाधित भागांमध्ये मदत पोहोचविणे अधिक सुलभ होईल.

4. ऑपरेशन सागर बंधू हे भारताच्या व श्रीलंकेच्या - लोकांमधील दृढ भावनिक बंध आणि – सरकारांमधील विश्वासार्ह भागीदारी यांचे प्रतीक आहे. लवकरात लवकर पुनर्स्थापना, पुनर्वसन व

पुनर्बांधणी सुनिश्चित करण्यासाठी चालू असलेल्या ऑपरेशन सागर बंधू मध्ये श्रीलंकेच्या अधिकाऱ्यांसोबत काम करणे सुरू ठेवण्यासाठी भारत पूर्णपणे वचनबद्ध आहे.

**नवी दिल्ली**

09 डिसेंबर 2025